शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे – ४११ ००१, यांचे कार्यालय.
दिनांक :– 25 JUN 1993

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद – पुणे

विषय :– प्रथम मान्यता
नूतन विद्यालय रेट वडी ता. खेड

संदर्भ :– आपले पत्र जा. क्र. शिक्षण/मसाध्य/ह-४/९२-९३
दिनांक २४.५.९३

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये श्री रोकडोबा शिक्षण संस्था, रेटवडी संस्थेच्या – मराठी – माध्यमिक शाळेच्या इ. ८ वी/एकी./१०/वीच्या वर्गास सन १९९१ – १९९२ या शैक्षणिक वर्षासाठी /सन १९९१ पासून प्रथम मान्यता / मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८] वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून आवश्यक नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३]

स्वाक्षरीनंतर शि. उ. सं. यांची
सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत:
मुख्याध्यापक
श्री रोकडोबा शिक्षण संस्था
रेटवडी ता. खेड जिल्हा पुणे

Received

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ई-४/९२.९३.
पुणे, दि. १०/३/९२.

प्रति,
सचिव,
श्री. रोकडोबा शिक्षण संस्था,
रेटवडी.

विषय :-- इ. ९ वी च्या वर्गास प्रथम मान्यता.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या रेटवडी ता. खेड या माध्यमिक विद्यालयातील इ. ८ वी च्या वर्गास मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे आदेश क्र. माध्य-३(२०)नमाशा/मान्यता/पुवि/९२ दि. ५/८/९१ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२. नुसार उपरोक्त शाळेस जून १९९२ पासून इ. ९वी च्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१] विषय शिक्षकांची नेमणूक करणेत यावी.
२] स्वतंत्र प्रयोगशाळा असावी.
३]
४]
५]
६]

मा. शि. अ. यांची
मान्य टिपणी

शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता

प्रत,
१. मुख्याध्यापक,
नूतन विद्यालय, रेटवडी
ता. खेड जि. पुणे.
२. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे. शिक्षण माध्यमिक.
शिक्षण/माध्य/ह-४/प्रथम मान्यता/९३-९४.
पुणे, दि. २८/१०/९३.

BOOK-POST

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
नूतन विद्यालय रेटवडी.
ता. खेड, जि. पुणे.

विषय :- इ. १०वी वर्गास प्रथम मान्यता.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कडील पत्र क्रमांक ३ प्रथम मान्यता/पुणे विभाग/९३ दि. ८/१०/९३.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपल्या ~~स्वामी विवेकानंद शि. प्र. मंडळ.~~ रोकडोबा शिक्षण संस्था रेटवडी संस्थेव्दारा संचालित मराठी/ ~~इंग्रजी~~ माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १०वी च्या वर्गास खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन ग्रंथांची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर उपलब्ध करावे.
६] पुरेसा ... प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७] शैक्षणिक, कार्यानुभव व क्रीडा साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
८] शैक्षणिक साहित्याचा अध्यापनात वापर असावा.
९] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन द्यावी.
१०] वाढीव फीचे दर मा. शि. संचालक, म. रा. पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
११] माध्यमिक शाळा संहितेनुसार शालेय रेकॉर्ड असावे.
१२] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
१३] शिक्षकांचा भविष्य निर्वाह निधी . खाती उघडावीत.
१४] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करुन घेण्यात यावी.
१५] अभ्यासेतर कार्यक्रम, विविध स्पर्धा व परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे.

Received
15/12/93